# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0689 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/09/2025 00:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 24/09/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/09/2025
**Time From (वेळेपासून):** 17:11 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/09/2025 **Time (वेळ):** 00:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/09/2025 00:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** महालक्ष्मी चेंबर्स,कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complaintant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत, प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर,शाहुपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत, प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर,शाहुपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनायक सुरेष तेजम | | | 1. नए9, मंजुळा अपार्टमेंट, केडीसीबकेसमोर शाहुपुरी, कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रुपय दराच्या 50 चलनी नोटा एकुण 25000/ | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 26/09/2025

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष शाहुपूरी पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 24/09/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना, मला पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांनी 14.00 वाजता त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन समक्ष हजर असले तक्रारदार पृथ्वीराज वसंतराव देसाई, मुळ रा. ज्ञानराज फार्म हाउस, देसाई मळा संतुबाई मंदिरजवळ हेरवाड ता. शिरोळ जि.कोल्हापूर सध्या रा. किंग्जकोर्ट अपार्टमेंट, शिवाजी पार्क, कोल्हापूर यांची ओळख करून देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन, त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेवुन पुढील कारवाई करणेबाबतचा आम्हास मुखशील आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी थोडक्यात हकिकत सांगितली की, मी ट्रान्स्पोर्ट चा व्यवसाय करतो. माझे नावे कोल्हापूर शहर हद्दीतील सिटी सव्हे झालेली, मालकी वहिवाटीची वाॅर्ड ई - 1, सि.स.नं.318/3 पैकी 57.67 चै.मी. ची मिळकत आहे. माझे वरील मिळकतीवर 'ब' सत्ताप्रकार अशी नोंद झालेली होती. सदरची नोंद कमी करण्यासाठी मी माझे ओळखीचे खाजगी वकील विनायक तेजम यांना विचारले असता, त्यांनी मला त्यांची करवीर प्रांत कार्यालयामधील अधिकारी कर्मचारी यांची ओळख असुन त्यांचेकडुन मी मिळकतीवरील ब सत्ता प्रकार कमी करून आणुन देवू शकतो असे मला विश्वासाने सांगितले त्यामुळे मी वकील तेजम यांचे मार्फतीने करवीर प्रांत कार्यालयात दिनांक 02/02/2025 रोजी प्रकरण दाखल केले त्यावेळी वकील तेजम यांनी माझे ओळखीचे अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन मिळकतीवरील ब सत्ता प्रकार कमी करून प्रांत कार्यालयातुन आदेश घेवून देतो त्याकरीता माझे फि सह प्रांत कार्यालयात देणेसाठी पहिल्यांदा 1,65,000/- रूपये दयावे लागतील असे सांगितले होते. माझे मिळकतीवर ब सत्ता प्रकार अशी झालेली नोंद कमी होणे माझेसाठी अत्यंत गरजेचे असलेने मी नाईलाजाने फेबु्रवारी व मार्च 2025 मध्ये वेळोवेळी वकील तेजम यांना वरील कामासाठी 1,65,000/- रूपये रोख त्यांचे महालक्ष्मी चेंबर्स कोल्हापूर येथील कार्यालयात दिलेले आहेत त्यावेळी माझे मित्र अमेय जमदग्णी हे माझे सोबत होते.

माझे कामाबाबत वेळोवेळी मी त्यांचे संपर्कात राहुन माहिति घेत होतो त्यावेळी त्यांनी काम प्रोसेस मध्ये आहे असे सांगत होते. जुलै 2025 मध्ये त्यांनी काम सहीसाठी पुढे गेले आहे असे सांगुन माझेकडे त्यांनी आणखीन 1,00,000/- रूपये प्रांत कार्यालयात दयावे लागतील तरच आपले काम पुर्ण होईल असे सांगितले त्यावेळी मी त्यांना यापुर्वी 1,65,000/- रूपये दिलेले असताना प्रांत कार्यालयात आणखीन कोणाला पैसे दयावे लागत आहेत असे विचारले असता त्यांनी प्रांत अधिकारी कार्यालय करवीर येथुन आदेश आणुन देणार आहे त्याकरीता तुम्हाला 1,00,000/- रूपये दयावेच लागतील असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा झालेनंतर तुम्हाला भेटतो असे सांगुन निघून आलो होतो.

त्यानंतर मी वकील तेजम यांचे अपरोक्ष दिनांक 11/07/2025 रोजी प्रांत कार्यालय, करवीर जि.कोल्हापूर येथे जावून माझे प्रकरणाबाबत माहिति घेतली असता माझे प्रकरणाचा दिनांक 04/07/2025 रोजी प्रांताधिकारी करवीर यांनी आदेश देवून ब सत्ता प्रकार कमी केलेला होता. तसेच सदरचा मुळ आदेश वकील तेजम हे घेवून गेले आहेत असे समजले सदर आदेशाची नक्कल प्रत मी प्राप्त केली आहे. त्यानंतर मी माझे वरील मिळकतीचे कामाचे

अनुषंगाने दोन ते अडीच महिने व्यस्त होतो. सप्टेंबर महिन्याचे दुस-या आठवडयात मी वकील तेजम यांना भेटुन त्यांना माझे वरील नमुद कामाचे काय झाले याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला माझे प्रकरणाबाबत आदेश झाला असुन सदरचा आदेश त्यांचेकडे असल्याचे सांगुन यापुर्वी माझेकडे मागणी केलेले 1,00,000/- रूपये लवकर दया सदरचे पैसे प्रांत अधिकारी यांना दयावयाचे आहेत असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना यापुर्वी मी पैसे दिलेले आहेत कामाचा आदेश दया असे म्हणालो असता त्यांनी मला मी प्रांत अधिकारी यांचेकडुन सदरचे काम करून घेतले आहे त्यामुळे त्यांना देणेकरीता 1,00,000/-रू दयावे लागतील तेव्हाच आदेश मिळेल, असे सांगितले त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा झालेनंतर भेटतो असे सांगुन निघुन आलो होतो त्यानंतर मला वारंवार फोन करून पैशाची मागणी करीत होते. दिनांक 21/09/2025 रोजी पुन्हा वकील तेजम यांनी मला फोन करून पुन्हा पैश्याची मागणी केली. माझे मिळकतीबाबतच्या प्रकरणाचा आदेश वकील तेजम यांनी प्रांत कार्यालय करवीर येथुन त्यांचे ओळखीचे प्रांत अधिकारी यांचेकडुन करून घेतला आहे. परंतु वकील तेजम यांना मला त्यांचे मागणीप्रमाणे 1,00,000/- रू. लाच रक्कम देणेची इच्छा नाही. तसेच यापुर्वी खाजगी वकील तेजम यांचेशी माझे कोणतेही देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. तसेच माझा आणि त्यांचा कोणताही वाद नाही. तरी त्यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे, म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला.

त्यावेळी तक्रारदार देसाई यांनी ते खाजगी वकील तेजम यांना दिनांक 24/09/2025 रोजी 16.30 वाजाता त्यांचे महालक्ष्मी चेंबर्स कोल्हापूर येथील कार्यालयात भेटण्यास जाणार असलेचे सांगितले. त्यावेळी मी लागलीच सहा. षिक्षण संचालक, कोल्हापूर कार्यालयातुन लेखी रिपोर्टने शासकीय पंच बोलावुन घेतले. त्यावेळी मी तक्रारदार देसाई यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. मी सर्वांना तक्रारीची पडताळणी ला.प्र.वि.कोल्हापूर कार्यालयातुन करणार आहोत असे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार देसाई यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. देसाई यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार देसाई व पंच नं.01 गोंधळी यांचेसह खाजगी वकील विनायक तेजम यांचे महालक्ष्मी चेंबर्स कोल्हापूर येथे असले कार्यालयात पाठवुन देसाई यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे खाजगी वकील विनायक तेजम हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकाॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार देसाई व पंचाची खात्री करून दिली. तसेच डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. तक्रारदार देसाई व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड केले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकाॅर्डर 17.11 वाजता चालु करून, तो तक्रारदार देसाई यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन तक्रारदार देसाई व पंच नं.1 गोंधळी यांना खाजगी वकील विनायक तेजम यांची भेट घेण्याकरीता, पंच नं.02 भुसारे यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 बी झेड 1880 वरून सीपीआर चैक - दसरा चैक मार्गे दाभोळकर काॅर्नर मार्गे वकील तेजम यांचे महालक्ष्मी चेंबर्स कोल्हापूर येथील कार्यालयात पाठविले. तक्रारदार व पंच नं.1 गोंधळी असे वकील तेजम यांचे कार्यालयात जावुन, त्यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 17.55 वाजता बंद केला.

आम्ही प्रथम पंच नं.01 गोंधळी यांना खाजगी वकील तेजम यांना भेटणेस गेलेनंतर, तेथे काय घडले याबाबत विचारले असता, त्यांनी तक्रारदार देसाई यांचे सोबत वकील तेजम यांचे कार्यालया जवळ गेलो. त्यावेळी तक्रारदार देसाई यांनी वकील तेजम यांना फोन करून, त्यांना आॅफीस बाहेर असुन भेटायला येत असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही वकील तेजम यांना त्यांचे कार्यालयात भेटलो. त्यावेळी वकील तेजम व देसाई यांचेत प्रांत कार्यालयात मिळकतीचे अनुषंगाने दाखल केले प्रकरणाबाबत बोलणे झाले. त्यावेळी देसाई यांनी वकील तेजम यांना आपली आॅर्डर झाली काय ? असे विचारले, त्यावर वकील तेजम 'होय.... आॅर्डर होवून महिना दिड महिना झालं. तुम्हाला सांगितलेलं फोन करून...' असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार देसाई 'बर साहेब आता कस कस काय काय पेमेंटचं...' असे विचारले. त्यावेळी वकील तेजम यांनी '25 हजार रूपये दया...' असे म्हणाले. त्यावेळी देसाई यांनी '25 हजार रूपये बर... आता हिकडं यांचे काय दयायचे होते ते...' असे म्हणाले, त्यावर वकील तेजम 'नाय ते सगळ झालयं...'असे म्हणाले. त्यावेळी देसाई 'सगळ झालयं का? मग आपण 1,65,000/- दिलयं त्यात सगळ कव्हर झालं, ठिक हाय तुम्ही, पप्पा यायला लागल्यात मला वाटलं सगळयाचं सांगितल्यालं, आता एक लाखाची अमाउंट तुम्ही बोलला होता सगळयाचं दयायचं म्हणून, पप्पाना बोललो ते थोडया वेळात यायला लागल्यात ते आले की तुम्हाला मी देतो करून...' असे म्हणाले. त्यावेळी वकील तेजम 'त्याना ते पैसे दयायचे आहेत, ते दररोज फोन करत्यात म्हणून मी तुम्हाला फोन करायला लागलोय...' असे म्हणाले, त्यावेळी देसाई 'कुणाला.....या साहेबांना दयायचे आहेत काय ?' असे विचारले, त्यावेळी वकील तेजम 'व्हय त्यांनाचं दयायचे आहेत.मला नाही ते...' असे

म्हणाले, त्यावेळी तक्रारदार देसाई 'कुठलं आपलं ते भुमी अभिलेखला काय? भुमापन ला...' असे विचारले, त्यावेळी वकील तेजम 'ज्याचं आ◌ॅर्डर हाय त्यांना...' असे म्हणाले, त्यावेळी देसाई 'उपविभागीय अधिकारी करवीर विभाग कोल्हापूर, अच्छा प्रांत आ◌ॅफिसला..., सर लवकर काम झालं असतं खर काय सांगू सर ऐवढया अडचणीतणं कस काय काय केलयं माझं मला माहिती हाय सगळं...' असे म्हणाले, त्यावेळी वकील तेजम 'नाय, काय झालयं आपल्या सांगण्यावरन..... आपलं दररोज काम आहे तिथं त्यामुळे सांगन्यावरून त्यांनी केलयं हे, म्हणून तुम्हाला... मला दररोज त्यांचा फोन यायला लागलाय, तिकडं आ◌ॅफिस मधणं...' असे म्हणाले. त्यावेळी देसाई यांनी 'बर त्यांना आता हे 25 हजार दिलं की झालं...' असे विचारले, त्यावेळी वकील तेजम 'व्हयं संपतय काम ते...' असे म्हणाले. त्यावेळी देसाई 'आणि आपली फीचं कसं...' असे विचारले, त्यावेळी वकील तेजम 'तेचं दया, त्यांना देवून टाकूया उगीच आमचं नाव खराब व्हायला लागलयं गेली दोन महिने झाले...' असे म्हणाले, त्यानंतर पुन्हा त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने होवुन वकील तेजम यांनी देसाई यांचेकडे त्यांचे कामाचा मुळ आदेश दिला. त्यावेळी देसाई 'नाय आपलं बोलणं झालेलं म्हटलेलं सगळ मिळून 1,65,000/- मध्ये बसन म्हटलेलं सगळं, त्या 1,65,000/- हजार सगळचं होवून जाईलं...' असे म्हणाले. त्यावेळी वकील तेजम 'ते आता काय हाय माहित हाय तो तेन्ही...' असे म्हणाले, त्यावेळी देसाई 'बरोबर हाय तुमचं कायमचं व्यवहार असतात सर...' असे म्हणाले, त्यावेळी वकील तेजम 'माहिती हाय कणी, एकदा आ◌ॅर्डर आपली हे झालेली आहे. आपण करून घेतलयं, एकदा ते अ◌ॅप्लीकेशन ठे◌ेवलेलं रिजेक्ट झालेलं अ◌ॅप्लीकेशन...' असे म्हणाले, त्यानंतर त्यांचेत पुन्हा कामाचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी तक्रारदार देसाई 'साहेब येतो मी करून घेतो तुम्हाला फोन करतो आणि थोडया वेळात येवून जातो आपण आ◌ॅफिसला किती वाजेपर्यंत असणारा काय...' असे विचारले, त्यावेळी वकील तेजम 'काय मला आ◌ॅनलाईन करा काय अडचण नाही...' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार देसाई 'चालतय ठिक आहे...' असे म्हणुन आम्ही तेथुन निघुन आलो आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार देसाई यांना वकील तेजम यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 गोंधळी यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली.

तक्रारदार देसाई यांचे मिळकतीचे ब सत्ता प्रकार कमी करण्याचे काम खाजगी वकील विनायक ते◌ेजम यांनी प्रांत कार्यालय करवीर येथुन करून घेवुन त्याचा आदेश काढुन दिला म्हणुन प्रांताधिकारी करवीर यांना यापुर्वी 1,65,000/- रूपये दिल्याचे कबुल करून आणखीन 25,000/- रूपये त्यांना दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार देसाई यांचेकडे 25,000/- रूपये लाच मागणी केल्याचे, तसेच सदरची लाच रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. परंतु वकील विनायक तेजम यांनी प्रांत करवीर यांचेसाठी लाच मागणी केली असल्याने, करवीर प्रांताधिकारी मौसमी चैगुले यांचे लाचेची पडताळणी करण्याचे सर्वामते ठरले. दरम्यान 19.42 वाजता तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9011011010 वरती वकील विनायक तेजम यांचा मोबाईल क्रमांक 9970566257 फोन आला त्यावेळी त्यांचेत पैसे उदया देणेबाबत चर्चा झाली सदरचा का◌ॅल रेका◌ॅर्ड केला. प्रांताधिकारी चैगुले मॅडम यांची पडताळणी दिनांक 25/09/2025 रोजी करण्याचे सर्वामते ठरवुन चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनांक 25/09/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता आम्ही, तक्रारदार देसाई, दोन शासकीय पंच व सापळा पथक असे ला.प्र.वि.कार्यालयात हजर झालो. मी तक्रारदार देसाई व पंच न1◌ं गोंधळी यांना प्रांताधिकारी मौसमी चैगुले मॅडम यांचे लाचेच्या मागणीच्या अनुषंगाने तक्रारदार देसाई व पंच नं.01 गोंधळी यांचेसह प्रांत कार्यालय करवीर येथे पाठवुन मौसमी चैगुले मॅडम हया विनायक तेजम यांनी त्यांचेसाठी मागणी केलेल्या लाच रक्कमेस दुजोरा देवुन लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेका◌ॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वी दिनांक 24/09/2025 रोजीच्या पडताळणी कारवाईवेळी ध्वनिमुद्रीत झालेल्या 02 फाईल्स रेका◌ॅर्ड होत्या. त्यानंतर चैगुले मॅडम यांचे पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेका◌ॅर्डर 13.32 वाजता चालु करून, तो तक्रारदार देसाई यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन तक्रारदार देसाई व पंच नं.1 गोंधळी यांना प्रांत कार्यालय करवीर येथे प्रांताधिकारी चैगुले मॅडम यांची भेट घेण्याकरीता, पंच नं.02 भुसारे यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 बीझेड 1880 वरून प्रांत कार्यालय करवीर येथे पाठविले. तक्रारदार देसाई व पंच नं.1 गोंधळी असे करवीर प्रांत कार्यालयात जावुन प्रांताधिकारी चैगुले मॅडम यांना भेटुन ला.प्र.वि.कोल्हापूर कार्यालयात परत आले. त्यावेळी व्हाईस रेका◌ॅर्डर 14.42 वाजता बंद केला. त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं. 1 गोंधळी त्यानंतर तक्रारदार देसाई यांचेकडे करवीर प्रांत कार्यालय येथे प्रांताधिकारी मौसमी चैगुले मॅडम यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी प्रांतधिकारी मौसमी चैगुले यांनी देसाई यांना त्यांचे काम झाले असुन,

कामासाठी कोणालाही पैसे देवु नका तसेच येथे कायदेशिर कामे केली जातात, तसेच वकील विनायक तेजम यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेल्या रक्कमेबाबत तक्रार करा, असे बोलने झाल्याचे सांगितले. एकंदरीत चैगुले मॅडम यांचे पडताळणी मध्ये त्यांनी कोणतीही लाच मागणी अगर लाच मागणीस दुजोरा दिलेला नसल्याचे निष्पन्न झाले. परंतु वकील विनायक तेजम यांनी प्रांत कार्यालय करवीर येथुन तक्रारदार देसाई यांचे मिळकतीवरील ब सत्ता प्रकार कमी करणेचा आदेश काढुन दिला म्हणुन प्रांताधिकारी करवीर यांना देणेसाठी 25,000/- रूपयांची लाच मागणी केल्याचे निषन्न झाल्याने आम्ही वकील विनायक तेजम यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

त्यानंतर मी तक्रारदार देसाई यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 50 चलनी नोटा अशी 25,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार देसाई व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अॅथ्रासिन लावलेले 25,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार देसाई, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, वकील तेजम यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार देसाई यांनी त्यांच्या षर्टच्या दुमडलेल्या हाताच्या बाह्या खाली कराव्यात असा इषारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने मी तक्रारदार देसाई व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड केले. त्यानंतर व्हाईस रेकाॅर्डर सकाळी 15.59 वाजता सुरू करून तो तक्रारदार यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार देसाई व पंच नं.1 गोंधळी यांना पंच नं.02 भुसारे यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 बीझेड 1880 वरून सीपीआर चैक - दसरा चैक मार्गे दाभोळकर काॅर्नर मार्गे महालक्ष्मी चेंबर्स, कोल्हापूर येथील विनायक तेजम यांचे कार्यालयात पाठविले. त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 भुसारे असे आमचेकडील शासकीय बोलेरो वाहनाने महालक्ष्मी चेंबर्स, कोल्हापूर येथील वकील विनायक तेजम यांचे कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. त्यावेळी तक्रारदार देसाई व पंच गोंधळी असे महालक्ष्मी चेंबर्स, कोल्हापूर येथील वकील विनायक तेजम यांचे कार्यालयाचे बाहेर थांबुन होते. त्यावेळी तक्रारदार देसाई यांनी पंचासमक्ष वकील तेजम यांचे मोबाईल क्रमांक 9970566257 वर त्यांचे मोबाईल क्रमांक 9011011010 वरून आॅफिसला आल्याचे सांगितले. त्यानंतर थोडयावेळात तेजम हे त्यांचे महालक्ष्मी चेंबर्स, कोल्हापूर येथील विनायक तेजम यांचे कार्यालयात आले. त्यावेळी वकील, त्यांचे पाठोपाठ तक्रारदार देसाई व पंच गोंधळी असे त्यांचे कार्यालयात गेले. त्यावेळी वकील तेजम 'लवकर सुट्टी झाली...' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार देसाई 'लवकर माझ लवकरच असतयं, सकाळी आठ वाजता जातोय, बारा एक पर्यंत म्हणजे आवरतय... चिरंजीव...' असे म्हणाले, त्यावेळी वकील तेजम 'होय... ये...' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार देसाई ' साॅरी थोडा डिले झाला थोडा...' असे म्हणाले, त्यावेळी वकील तेजम ' नाही असुदे घ्याकी, पंचवीस हाईत काय...'असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे उजव्या खिशातील लाच रक्कम काढून वकील तेजम यांचेकडे दिली, त्यावेळी वकील तेजम यांनी लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारून बाजुच्या टेबलच्या ड्राॅव्हरमध्ये ठेवली. त्यावेळी तक्रारदार देसाई ' पंचवीस हाईत, मोजुन घ्या की सर...' असे म्हणाले, त्यावेळी वकील तेजम ' दया आता काय तुमच्यावर विश्वास पहिल्या पासून ठेवलाय आम्ही, काय चहा घ्यायचा...' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार देसाई ' नको चहा नको, जावुन जेवणार...'असे म्हणाले त्यावर वकील तेजम 'हां...हां... ठीक हाय...' असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी वकील तेजम यांनी पैसे स्विकारलेबाबतचा त्यांच्या षर्टच्या दुमडलेल्या हाताच्या बाह्या खाली करून पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 भुसारे व स्टाफ तेथे गेलो. त्यावेळी तक्रारदार देसाई यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर 16.25 वाजता बंद करून तात्काळ वकील विनायक तेजम यांना पकडले. त्यावेळी वकील तेजम यांनी तक्रारदार देसाई यांचेकडून स्विकारलेली लाच रक्कम 25,000/-रू त्यांच्या टेबलच्या ड्राॅव्हरमधुन पंचासमक्ष ताब्यात घेतली. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या, त्यावेळी सदर सापळा कारवाईचे पोहेकाॅ/सुधीर पाटील यांनी त्यांचेकडील मोबाईल फोनमध्ये व्हिडीओ षुटींग केले आहे. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात येवुन पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार पृथ्वीराज देसाई यांचे कोल्हापूर येथील मिळकती वरील ब सत्ता प्रकार कमी करणेसाठीचे प्रकरणावर प्रांत कार्यालय करवीर येथुन आदेश काढुन देणेसाठी खाजगी वकील विनायक तेजम याने प्रांत कार्यालयात देणेसाठी तक्रारदार यांचेकडुन यापुर्वी 1,65,000/- रूपये घेतल्याबाबत दुजोरा देवुन तक्रारदार देसाई यांच्याकडे त्यांचे मिळकतीचे प्रकरणाचा आदेश प्रांत कार्यालय करवीर यांचेकडुन प्राप्त करून घेतला म्हणुन प्रांताधिकारी करवीर यांचे नाव सांगुन त्यांचेकरीता आणखीन 25,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार देसाई यांचेकडे बेकायदेशिरपणे लाचेची मागणी करून, मागणी केलेली लाच रक्कम 25,000/- रूपये

विनायक तेजम याने तक्रारदार देसाई यांचेकडुन बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही सापळा पथकासह पकडले आहे म्हणुन माझी विनायक सुरेश तेजम, वय - 37 वर्षे, खाजगी वकील, रा. फ्लॅट नं.ए-9, मंजुळा अपार्टमेंट, के.डी.सी.सी.बँक समोर शाहुपूरी कोल्हापूर, जि.कोल्हापूर याचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

santosh gundopant doke(I (Inspector)) / SGDM7903 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)
**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): santosh gundopant
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): SGDM7903